(175)

क्रमांक: प्राधिकरण - ११/ ४३८८ /७७

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
१८ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई नं. ४०० ०२१.

दिनांक : ३० जुलै, १९७७.

प्राधिकरणाच्या दिनांक ९ जून, १९७७ रोजी भरलेल्या अकराव्या सभेच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत जोडली आहे.

(कार्यवृत्ताची इंग्रजी प्रत या अगोदरच्या दिनांक २१ जून, १९७७ च्या पत्रान्वये पाठविण्यात आली आहे)

सचिव,
कार्यकारी समिती.

प्रति,
सर्व सदस्य.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या

दिनांक ९ जून, १९७७ रोजी भरलेल्या अकराव्या बैठकीचे कार्यवृत्त

ठिकाण : मुंबई महानगर पालिकेचे महानगर सभागृह

बैठकीस उपस्थित असलेल्या सदस्यांची आणि निमंत्रितांची यादी प्रपत्र 'अ' म्हणून जोडली आहे.

२) प्रथम महापौरांनी अध्यक्ष व सदस्यांचे स्वागत केले.

३) अध्यक्षांनी नवीन सदस्यांचे स्वागत केले व निवृत्त झालेल्या सदस्यांच्या सेवेचा गौरवपूर्ण उल्लेख केला. पूर्वीचे अध्यक्ष डॉक्टर रफिक झकेरिया यांचे प्राधिकरणास सुरवातीपासून मार्गदर्शन लाभले आणि प्राधिकरण प्रस्थापित करण्यासाठी करण्यात आलेला कायदा करण्यात त्यांचा सहभाग होता. त्यांचा खास उल्लेख अध्यक्षांनी केला.

४) त्यानंतर कार्यक्रम पत्रिकेवरील बाबी विचारात घेण्यात आल्या.

बाब क्र. १ : मागील (दहाव्या) बैठकीच्या कार्यवृत्तास पुष्टी देणे

कार्यवृत्तास पुष्टी देण्यात आली.

बाब क्र. २ : मागील (दहाव्या) बैठकीच्या कार्यवृत्तावर करण्यात आलेली कार्यवाही

ठराव ११८ : केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.

बाब क्र. ३ : जमीन वापरासंबंधी

मुंबई महानगर विकास प्राधिकरण विनियम १९७४ च्या कलम १३(१) खाली काढावयाच्या प्रस्तावीत अधिसूचनेमागील उद्देश व त्यातील तरतूदी महानगर आयुक्तांनी थोडक्यात समजावून दिल्या. प्रस्तावीत अधिसूचनेतील स्पष्टीकरणाच्या खंड (१) परिच्छेद एकच्या उपपरिच्छेद (अ) खाली " कार्यालय जागा म्हणजे" या शब्दा नंतरचा आणि "जागी" या शब्दापूर्वीचा टंकलेखन चुकीमुळे पडलेला "कार्यालय" हा शब्द काढून टाकण्यास परवानगी मागितली.

चर्चेनंतर असे ठरविण्यात आले की, प्रस्तावीत अधिसूचनेचा खास करुन परिच्छेद १ चा उपपरिच्छेद (ब) हा, (१) मुंबई इमारती दुरुस्ती आणि पुन:रचना मंडळाच्या इमारतीचे बांधकाम, पुनर्रचना किंवा वाढीव काम, व (२) शासन अथवा स्थानिक प्राधिकरण अथवा सार्वजनिक विश्वस्त संस्थेच्या नागरीकांस शिक्षण किंवा वैद्यकीय सुविधा उपलब्ध करुन देण्याकरीता केलेल्या बांधकामास, इमारतीच्या पुन:रचनेस किंवा सध्याच्या इमारतीच्या वाढीस लागू करण्यात येऊ नये.

मुंबई टेलिफोनचे महाव्यवस्थापक आणि मुंबई पोर्ट ट्रस्टचे अध्यक्ष यांनी असा आग्रह धरला की, दूरध्वनी व तार खात्याच्या इमारती व पोर्ट ट्रस्ट कार्यालयें व कर्मचारी निवास इमारतीस अधिसूचनेच्या कक्षेतून वगळण्यात यावे. अध्यक्षांनी त्यांना असे आश्वासन दिले की, सर्व योग्य प्रकरणे परवानगी देण्यासाठी प्राधिकरणातर्फे विचारार्थ घेण्यात येतील.

......2/-

ज्याअर्थी अधिसूचनेशी संबंधित प्रदेश मुंबई महानगर पालिकेच्या कक्षेत आहे त्या अर्थी, परवानगी देताना मुंबई महानगर पालिकेच्या सल्याने देण्यात यावी अशी इच्छा कांही सदस्यांनी व्यक्त केली. मुंबई महानगर विकास प्राधिकरण विनियम, १९७४ कलम ७(२) (पांच) अन्वये अशी परवानगी देण्याचे अधिकार किंवा कार्यकक्षा कार्यकारी समितीची असल्याचे महानगर आयुक्तांनी निदर्शनास आणून दिले. आणि असा सल्ला दिला की, प्राधिकरणाने हा अधिकार किंवा ही कार्यकक्षा कमी अधिक करणे योग्य होणार नाही. त्यांनी असेही निदर्शनास आणून दिले की, नगरपालिका आयुक्त, कार्यकारी समितीचे सदस्य असून, मुंबई महानगर पालिकेचा दृष्टीकोन त्यांनी मांडावा ही अपेक्षा आहे व कार्यकारी समिती हा दृष्टीकोन लक्षात घेऊनच निर्णय देईल. चर्चेअंती अध्यक्षांनी असे आश्वासन दिले की, मुंबई महानगर विकास प्राधिकरण विनियम १९७४ मधील तरतूदींच्या अधीन राहून कार्यकारी समितीस विनंती करण्यात येईल की, परवानगी देताना मुंबई महानगर पालिकेचा दृष्टीकोन समजून घेण्यासाठी महापालिकेशी विचारविनिमय करावा. त्यांनी पुढे सांगितले की, मुंबई महानगर पालिकेशी विचार विनिमय करण्यासाठी कोणती पध्दत अवलंबावी हे कार्यकारी समितीनेच ठरवावे. त्यानंतर पुढील ठराव मंजूर करण्यात आला.

<u>ठराव ११७</u> : मुंबई महानगर विकास प्राधिकरण विनियम १९७४ चे कलम १३ चे उपकलम (एक) ने प्रदान केलेल्या आणि यासंबंधातील अन्य सर्व अधिकारांचा उपयोग करुन, असा ठराव करण्यात येतो की, प्राधिकरण सोबत जोडलेली (प्रपत्र 'ब') अधिसूचना प्रसृत करण्यास संमती देत असून महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात त्याच विनियमाच्या कलम ७ अ खाली प्राप्त होणा-या अधिकारांनुसार ही अधिसूचना त्यांच्या सहीनिशी प्रकाशित करण्यास महानगर आयुक्तांस अधिकार देण्यात येत आहेत.

<u>बाब क्र. ४</u> : <u>बांद्रा – कुर्ला संकुल प्रस्तावीत योजनेचा मसूदा</u>

<u>ठराव ११८</u> : महाराष्ट्र विभागीय आणि शहर नियोजन विनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख " तो विनियम " असा करण्यात आला आहे) खंड (ड) कलम ४० चे उप-कलम (३) ने प्रदान केलेल्या अधिकाराचा उपयोग करुन तसेच शासन अधिसूचना, नगरविकास आणि सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक बीकेआर-११७७/२६२-युडी-५, दिनांक ७ मार्च १९७७ च्या संदर्भानुसार आणि त्यासंबंधात प्राप्त होणारे सर्व अधिकाराचा उपयोग करुन असा ठराव करण्यात येत आहे की, महानगर प्राधिकरण, बांद्रा-कुर्ला संकुलातील ज्या जमीनीसाठी त्याच शासकीय अधिसूचनेखाली प्राधिकरणास खास नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित करण्यात आले आहे, त्या बांद्रा-कुर्ला अधिसूचीत क्षेत्रासाठी कार्यक्रम पत्रिकेवरील प्रस्तावीत मसूदा, महाराष्ट्र शासन राजपत्रात आणि "टाईम्स ऑफ इंडिया" आणि "लोकसत्ता" या दोन स्थानिक वृत्तपत्रांत त्या विनियमाच्या कलम २८ मध्ये विहित केलेल्या पध्दतीनुसार, महाराष्ट्र शासन राजपत्रात सूचना प्रकाशीत झाल्या दिनांकापासून 30 दिवसांच्या आत त्यावर हरकती

आणि सूचना मागविण्यासाठी, प्रकाशीत करण्यास, मान्यता देत आहे.

त्या विनिमयाच्या कलम १३७ नुसार महानगर आयुक्त, महानगर प्राधिकरणाचे सचिव असल्याने उपरोक्त सूचना महानगर आयुक्तांच्या सहीने प्रकाशीत करण्यात यावी असाही ठराव करण्यात येत आहे.

त्या विनिमयाच्या कलम २८ उपकलम (२) नुसार प्राप्त होणा-या अधिकाराचा आणि यासंबंधातील अन्य सर्व अधिकारांचा उपयोग करुन असाही ठराव करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रस्तावीत मसुद्यासंबंधी येणा-या सर्व हरकती आणि सूचना स्थायी समितीच्या पुढील सदस्यांच्या नियोजन समितीपुढे सुपूर्त करण्यात याव्यात :-

१) मंत्री, नगर विकास आणि अध्यक्ष, स्थायी समिती,

२) श्री. हंस मुग्रा,

३) श्री. सुधीर जोशी,

४) श्री. व्ही. के. टेंबे आणि

५) महानगर आयुक्त

आणि त्यांना असा आदेश देण्यात येत आहे की, सध्या अस्तित्वात असणा-या कायद्यानुसार त्यांनी कार्यवाही करावी.

बाब क्र. ५ : बांद्रा-कुर्ला संकुलातील जमीनी शासकीय/निम-शासकीय आणि सार्वजनिक क्षेत्रातील संस्थास देण्याबाबत.

महानगर आयुक्तांनी सांगितले की, स्थायी समितीने प्रस्ताव संमत केला असून, पहिल्या १५ हेक्टर मधील जमीनीच्या किंमती, जरी तदर्थ (अॅडहॉक) असल्या तरी, कार्यक्रम पत्रीकेत नमूद केलेल्या बाबीवर आधारित आहेत.

आस करुन जमीनीच्या विकासावर होणारा खर्च विचारात घेऊन हिंदूस्थान पेट्रोलियम निगमाला निवासी कारणासाठी कळविण्यात आलेली किंमत जी कमी आहे असे समजण्यात येते, त्यासंबंधात पुष्कळ चर्चा झाली. या विभागातील निवासी जागांसाठी पडणा-या जमीनीच्या किंमती विचारात घेता तदर्थ किंमत संपूर्णतः योग्यच असल्याचे महानगर आयुक्तांनी समजावून सांगितले. संपूर्ण प्रकल्पाचा विचार करता निवासी जागांबाबतच्या कमी किंमतीची तफावत व्यापारी उपयोगासाठी द्यावयाच्या किंमतीत भरपाई करण्यात येईल. असेही त्यांनी निदर्शनास आणले.

कार्यवृत्तावरील टिप्पणीत प्रस्तावीत केलेल्या संबंधित किंमतीपेक्षा कमी किंमतीत पहिल्या १५ हेक्टर मधील जमीनी स्थायी समितीने देऊ नये. या सुधारणेसह ठराव संमत करण्यात आला.

ठराव ११९ : असा ठराव करण्यात येत आहे की, स्थायी समितीने पुरस्कृत केलेल्या, शासकीय/निम शासकीय/सार्वजनिक क्षेत्रातील संस्थांसाठी पुढे निर्दिष्ट करण्यात येत असलेल्या भाडे-पट्टयाचे दर संमत करण्यात येत आहेत :-

(१) विक्री कर खाते कार्यालयासाठी — रु. ४००/- प्रत्येक चौ. मिटरला

(२) मुंबई टेलिफोन कर्मचारी निवासासह अर्ध व्यवसाईक कार्यासाठी — रु. ६००/- प्रत्येक चौ. मिटरला

(३) हिंदुस्तान पेट्रोलियम निगम मर्यादित ,कार्यालयासाठी — रु. ८००/- प्रत्येक चौ. मिटरला

(४) हिंदुस्तान पेट्रोलियम निगम मर्यादित, निवासी जागासाठी — रु. २५०/- प्रत्येक चौ. मिटरला

पुढे असाही ठराव करण्यात येत आहे की , बांद्रा-कुर्ला संकुलातील पहिल्या १५ हेक्टर मधील पुनःप्राप्त (रिक्लेम्ड) जमीनी शासकीय, अर्धशासकीय, सार्वजनिक संस्थाना देताना, ज्या जमिनीची किंमत ठरवण्याचा अधिकार स्थायी समितीला देण्यात यावा. स्थायी समितीने, देण्यात यावयाच्या जमिनीच्या सर्वसाधारण विकासाचा खर्च प्लॉट ज्या उपयोगाकरता वापरला जाणार आहे तो उपयोग, व अर्जदार विभाग/संस्था याचा दर्जा (स्टेटस्) लक्षात घेऊन, या ठरावानुसार संमत केलेल्या संबंधित किंमतीपेक्षा कमी नसेल अशात-हेने किंमती निश्चित कराव्यात.

बाब क्र. ६ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा १९७५-७६ चा वार्षिक अहवाल

ठराव १२० : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १९७४-७५ च्या वार्षिक अहवालाच्या मसुदा संमत करण्यात आला. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण विनियम- १९७४ च्या कलम २४ अन्वये महानगर आयुक्तांना अहवाल राज्य शासनास सादर करण्यास अधिकार देण्यात आले.

बाब क्र.७ प्राधिकरणाच्या १९७७-७८ च्या वार्षिक अंदाजपत्रकावरील विवरण.

विवरणाची नोंद घेण्यात आली. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण विनियम १९७४ च्या कलम १८, उपविभाग (१) खंड (अ) आणि (ब) खाली राज्य शासनाने अदा केलेल्या रकमांची माहिती द्यावी अशी इच्छा श्री सुधीर जोशी यांनी व्यक्त केली. महानगर आयुक्तांनी त्यांना ही माहिती देण्याचे मान्य केले.

बाब क्र. ८ : नगर रचना तज्ञ संच स्थापणे

थोड्या चर्चेअंती याबाबतची चर्चा पुढे ढकलण्यात आली.

बाब क्र. ९ : ठाणे खाडी - उल्हास नदी अंतर्गत जलमार्ग प्रकल्प - नवीन मुंबईतील वाशी पर्यंत पथदर्शक प्रकल्प

ठराव १२१ : पथदर्शक प्रकल्पाचा तपशील आणि गुणवत्ता यांचा विचार केल्यानंतर, ठाणे-उल्हास अंतर्गत जलमार्ग प्रकल्पावरील नविन मुंबईतील वाशी येथील अंतीम माल धक्का(कार्गोजेटी) बांधणीचे पथदर्शक प्रकल्पाचे काम राज्य शासनाने राज्य पातळीवरील योजना म्हणून त्वरीत हाती घ्यावे अशी आग्रहाची शिफारस प्राधिकरणाने करावी असा ठराव करण्यात आला.

........५/-

(181)



बाब क्र. १० : बांद्रा-कुर्ला संकुलातील जमिनी ताब्यात घेणे.

ठराव १२२ : बांद्रा-कुर्ला संकुलातील राज्य शासनाच्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करावयाचे मान्य केलेल्या जमिनी बाजार भावाने घेण्यात याव्यात आणि तत्संबंधीच्या अन्य अटी व शर्ती राज्य शासन ठरविल त्याप्रमाणे असाव्यात. असा ठराव करण्यात आला.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने घ्यावयाच्या बांद्रा-कुर्ला संकुलातील शासकीय जमिनीच्या विकासावर सिडकोने अगोदरच जो खर्च केलेला आहे त्यासंबंधात सिडकोला मोबदला काय देण्यात यावा हे ठरविण्याचे सर्वाधिकार अध्यक्षांना देण्यात आल्याचे ठरविण्यात आले.

बाब क्र. ११ : प्राधिकरणाची रचना व कार्ये

ही बाब स्थायी समितीकडे विचारविनिमयार्थ आणि योग्य त्या कार्यवाहीसाठी सुपुर्द करण्यात यावी असे ठरले.

बाब क्र. १२ : स्थावर मालमत्ता समितीने घेतलेल्या निर्णयांचा अहवाल

प्राधिकरणाने पूर्वीच संमत केलेल्या प्रकल्पासाठी ताब्यात घ्यावयाच्या जमिनीसंबंधी राज्य शासनाकडे करण्यात आलेल्या प्रस्तावाच्या संदर्भात, सदर अहवाल असल्याचे गृहनिर्माण, नगर नविनीकरण व पर्यावरण मंडळाच्या सदस्य-सचिवांनी आणि महानगर आयुक्तांनी स्पष्टीकरण केले.

अध्यक्षांनी असा आदेश दिला की, जर एखाद्या सदस्याला प्रकल्पाबाबतचा तपशील पाहिजे असेल तर त्या सदस्यास तो पाठविण्यात यावा.

श्रीमती ताराबाई वर्तक, श्री बसवंत आणि अन्य काही सदस्यांनी जमिनी ताब्यात घेतल्यामुळे प्रकल्पग्रस्तांच्या पुनःवसनाचा प्रश्न उपस्थित केला. प्राधिकरणाच्या प्रकल्पासाठी जमिनी ताब्यात घेतल्यामुळे प्रकल्पग्रस्तांचा प्राधिकरणाने विचार करावा हे अध्यक्षांनी मान्य केले आणि संबंधीत सदस्याने या प्रश्नावर स्वतंत्ररित्या त्यांजबरोबर चर्चा केल्यास बरे होईल असे अध्यक्षांनी सांगितले. त्यानंतर ठराव यथा प्रस्तावीत संमत करण्यात आला.

ठराव १२३ : असा ठराव करण्यात आला की, स्थावर मालमत्ता समितीने घेतलेले निर्णय आणि या निर्णयानुसार करण्यात आलेली कार्यवाही ज्याचा अहवाल कार्यक्रम पत्रिकेत देण्यात आला आहे त्याची नोंद घेण्यात आली.

बाब क्र. १३ : कार्यकारी समितीच्या सचिवांची नियुक्ती

ठराव १२४ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण विनियम १९७४ कलम ७, उपकलम (१) खंड (ब) मधील तरतूदींनुसार प्राधिकरण, श्री श्री. द. सुळे या महाराष्ट्र शासनाच्या अवर सचिव श्रेणीतील अधिकाऱ्यास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या सचिवपदी

......६/-

महाराष्ट्र शासनाकडून प्रतिनियुक्तीवर म्हणून ते ज्या तारखेपासून पदभार घेतील त्या तारखेपासून आणि शासन प्रतिनियुक्तीसंबंधी ज्या अटी व शर्ती घालील त्यानुसार या पदावर प्रतिनियुक्तीवर रहाण्यास शासनातर्फे मान्यता दिल्यास, नियुक्त करण्याचा प्रस्ताव संमत करीत आहे.

आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण विनियम १९७४ कलम ८ उपकलम (२) खंड (ब) नुसार त्याच विनियमाच्या कलम ७ उपकलम (१) खंड (ब) नुसार कार्यकारी समितीच्या सचिवांच्या नेमणूकीचे जे अधिकार प्राप्त होतात ते या ठरावान्वये स्थायी समितीस अदा करण्यांत येत आहेत.

पवार/-
२८.७३

जोडपत्र 'अ'

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक ९ जून, १९७७ रोजी भरलेल्या बैठकीस उपस्थित असलेल्या सदस्यांची सूची

| | | |
|---|---|---|
| श्री. रत्नाप्पा कुंभार, नगरविकास मंत्री | ... | अध्यक्ष |
| डॉ.श्रीमती सुशिला बलराज, राज्यमंत्री, नगरविकास | .. | उपाध्यक्ष |
| श्री. मुरली एस्. देवरा, मुंबईचे महापौर | .. | उपाध्यक्ष |
| श्री. एस्. के. वानखेडे, उद्योगमंत्री | .. | सदस्य |
| श्री. व्ही. आर्. होशिंग, गृहनिर्माण मंत्री | .. | " |
| श्री. एस्. व्ही. भावे, महाराष्ट्र शासनाचे मुख्य सचिव | .. | " |
| श्री. हशु अडवानी, मुंबई | | " |
| श्री. बी. एन्. आडारकर, अध्यक्ष, वहातुक आणि दळणवळण मंडळ | | " |
| श्री. जे. सी. अगरवाल, अध्यक्ष, मुंबई पोर्ट ट्रस्ट | | " |
| श्री. एस्. डी. बसवंत, विधानपरिषद सदस्य, शहापूर | | " |
| श्री. हंस भुग्रा, मुंबई | | " |
| श्री. बी. जी. देशमुख, महानगर पालिका आयुक्त, मुंबई महानगर पालिका | | " |
| श्री. एस्. एस्. शिंधे, विधानसभा सदस्य, मुंबई | | " |
| श्री. सुधीर जाशी, मुंबई | | " |
| श्री. एस्. ए. बांडवानी, मुंबई | | " |
| श्री. डी. के. आनविलकर, अध्यक्ष, अलिबाग नगरपालिका | | " |
| श्री. एम्. एम्. किणी, महाव्यवस्थापक, मुंबई टेलिफोन्स | | " |
| श्री. सोहनसिंग कोहली, मुंबई | | " |
| श्री. पुष्पकांत म्हात्रे, मुंबई | | " |
| श्री. डी. एस्. नलावडे, अध्यक्ष, स्थायी समिती, मुंबई महानगर पालिका | | " |
| डॉ. एम्. जी. परुळेकर, अध्यक्ष, वसई नगरपालिका | | " |
| श्री. डी. एन्. पाटील, अध्यक्ष, पंचायत समिती, पनवेल | | " |
| श्री. नकुल पाटील, विधानसभा सदस्य, डोंबिवली. | | " |
| श्री. व्ही. के. पाटील, अध्यक्ष, पंचायत समिती, भिवंडी | | " |
| श्री. एस्. डब्ल्यु. पटवारी, अध्यक्ष, डोंबिवली नगरपालिका | | " |
| श्रीमती कमला रामन, विधानसभा सदस्य, मुंबई | | " |
| श्री. एम्. एम्. सावंत, अध्यक्ष, बी.ई.एस्.टी. समिती, मुंबई महानगर पालिका. | | " |
| श्री. व्ही. के. टेंबे, विधानसभा सदस्य, मुंबई | | " |
| श्रीमती आशालता तोरस्कर, अध्यक्ष, सुधार समिती, मुंबई महानगर पालिका. | | " |
| श्रीमती ताराबाई वर्तक, अध्यक्ष, जिल्हा परिषद, ठाणे | | " |
| श्री. एच्. एम्. वंगारे, अध्यक्ष, जिल्हा परिषद, कुलाबा | | " |

निमंत्रित :

सचिव, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग

मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ.

पवार/-

No. BMRDA/11/3492/77.

BOMBAY METROPOLITAN REGION
DEVELOPMENT AUTHORITY,
18th Floor, New Administrative
Building, Opp. Mantralaya,
Madame Cama Road, Bombay-400 021.

185

Date : 21st June, 1977.

The minutes of the eleventh meeting of the Authority held on the 9th June, 1977.

Secretary, Executive Committee.

To:

All Members and permanent invitees
copies to all Officers of the B.M.R.D.A.

Vp:21.6.

(187)

ELEVENTH MEETING OF THE

BOMBAY METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY

Date: 9th June, 1977.

Place : Corporation Hall of the Bombay Municipal Corporation.

The list of members and invitees present is attached (Annexure A).

2. The Mayor welcomed the Chairman and members.

3. The Chairman welcomed the new members and placed on record the appreciation of the services of the former members, who had vacated office. He made a special reference to the services rendered by the former Chairman, Dr. Rafiq Zakaria, who had guided the Authority in its formative years, and who was also associated with the enactment of the legislation constituting the Authority.

4. The items of the agenda were then taken up for consideration.

Item 1 : Confirmation of the minutes of the last (tenth) meeting.

The minutes were confirmed.

Item 2 : Action taken on the minutes of the last (tenth) meeting.

RESOLUTION 116 :- The action taken was noted.

Item 3 : Matters relating to land use.

The Metropolitan Commissioner explained briefly the background and the provisions of the proposed draft notification under Section 13(1) of the Bombay Metropolitan Region Development Authority Act, 1974. He also sought leave to correct a small typographical mistake, deleting the word 'office' occurring after the words '"office premises" means' and before the word 'premises' in clause (i) of the Explanation below sub-paragraph (A) of para 1 of the draft notification.

After discussion, particularly in respect of sub-paragraph (B) of para 1 of the draft notification, it was decided that the construction or reconstruction of any building or addition to any existing building (i) by the Bombay Building Repairs and Reconstruction Board, and (ii) by Government or a local authority or a public charitable trust for the purpose of providing education or medical relief to the public, should be excluded from the scope of sub-paragrapb (B)

....2/-

of para 1 of the draft notification. The draft notification was amended accordingly.

The General Manager, Bombay Telephones, and the Chairman, Bombay Port Trust, urged that "telephone and telegraph operating" and buildings relating to the Port Trust offices and their staff quarters might be excluded from the purview of the notification. They were assured by the -- Chairman that all deserving cases would be considered by the Authority for granting permission.

Some members expressed a view that the grant of permission under the approved Notification should be done in consultation with the Bombay Municipal Corporation, inasmuch as the Notification related to the Bombay Municipal Corporation area. The Metropolitan Commissioner pointed out that the power or jurisdiction to grant such permission was conferred on the Executive Committee expressly by Section 7 (2) (v) of the Bombay Metropolitan Region Development Authority Act, 1974, and opined that it might not be appropriate for the Authority to limit or qualify such power or jurisdiction. Further, he pointed out that the Municipal Commissioner was a member of the Executive Committee, and that he might be expected to project the views of the Bombay Municipal Corporation, to which the Executive Committee would have due regard in granting permission. After some discussion, the Chairman assured that, subject to the provisions of the Bombay Metropolitan Region Development Authority Act, 1974, the Executive Committee would be requested to have consultations, whilst granting permission, with the Bombay Municipal Corporation for ascertaining its views. He added that he would leave it to the Executive Committee to evolve a procedure for consultations with the Bombay Municipal Corporation for this purpose. The following Resolution was then adopted.

RESOLUTION 117 :- Resolved that the Authority, in exercise of its powers under sub-section (1) of Section 13 of the BMRDA Act, 1974, and of all other powers enabling it in this behalf, approves of the issue of a Notification appended hereto (Annexure B) and authorises the Metropolitan Commissioner to have the said Notification published in the Maharashtra Government Gazette, duly authenticated by him in exercise of the powers under Section 7-A of the said Act.

....3/-

Item 4 : Bandra-Kurla Complex - Draft Planning Proposals for -

RESOLUTION 118 :- Resolved that, in exercise of its powers under clause (d) of sub-section (3) of Section 40 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") read with Government Notification, Urban Development & Public Health Department No. BKR-1177/262-UD-5, dated the 7th March, 1977 and all other powers enabling it in this behalf, the Metropolitan Authority do approve the publication of the Draft Proposals, as contained in the Agenda note, for the lands within its jurisdiction as the Special Planning Authority for the Bandra-Kurla Notified Area specified in the said Government Notification, together with a notice in the Maharashtra Government Gazette and two local newspapers, being the "Times of India" and the "Loksatta", in the manner prescribed under Section 26 of the said Act, inviting objections and suggestions thereto from the public within a period of not less than 30 days from the date of the notice in the Maharashtra Government Gazette.

Resolved further that the aforesaid notice be given and published over the signature of the Metropolitan Commissioner, being the Secretary to the Metropolitan Authority, pursuant to Section 137 of the said Act.

Resolved further that, in exercise of its power under sub-section (2) of Section 28 of the said Act and all other powers enabling it in this behalf, the Metropolitan Authority do approve to forward all objections and suggestions to be received to the aforesaid Draft Proposals to the Planning Committee consisting of the following members of its Standing Committee, that is to say :-

1. Minister for Urban Development and Chairman of the Standing Committee;
2. Shri Hans Bhugra;
3. Shri Sudhir Joshi;
4. Shri V.K. Tembe; and
5. Metropolitan Commissioner;

with a direction to deal with them in accordance with the law for the time being in force.

Item 5 : Allotment of lands to Government/Semi-Government/ Public Sector Organisations in the Bandra-Kurla Complex.

The Metropolitan Commissioner explained that the proposal had been approved by the Standing Committee and that the prices for disposal of plots from the first 15 hectares, though ad-hoc, were based on the considerations mentioned in the agenda note.

There was considerable discussion, particularly relating to the price offered to Hindustan Petroleum Corporation for residential purpose, which was considered low, looking to the estimated cost of land development. The Metropolitan Commissioner explained that, having regard to the land prices in the area for residential purpose, the ad-hoc price proposed was quite reasonable. He also pointed out that the lower pricing of residential plots would be made up by the pricing policy for commercial plots, considering the project as a whole.

The draft Resolution was then approved, with one modification that future allotments by the Standing Committee from out of the first 15 hectares should not be at prices lower than the corresponding prices proposed in the agenda note.

RESOLUTION 119 :- Resolved that the Authority approves of the following rates of lease premium recommended by the Standing Committee for the plots to be offered on lease to the Govt./Semi-Govt./Public Sector Organisations shown below :-

| | | |
|---|---|---|
| (i) | Sales Tax Department for office purpose. | Rs.400/- per square metre. |
| (ii) | Bombay Telephones for para commercial use, including staff quarters. | Rs.600/- per square metre. |
| (iii) | Hindustan Petroleum Corporation Ltd. for office purpose. | Rs.800/- per square metre. |
| (iv) | Hindustan Petroleum Corporation Ltd. for residential purpose. | Rs.250/- per square metre. |

Resolved further that the Standing Committee is authorised to fix the prices of plots, which may be allotted by it to Government/Semi-Government/Public Sector Organisations from the first 15 hectares reclaimed in the Bandra-Kurla Complex, having regard to the approximate overall development cost of the allottable area, user for which the plot is allotted and the status of the applicant department/undertaking, such prices being not lower than the corresponding prices approved under this Resolution.

....5/-

Item 6 : Annual Report of the BMRDA for 1975-76.

RESOLUTION 120 :- The draft of the Annual Report of the Bombay Metropolitan Region Development Authority for 1975-76 is approved. The Metropolitan Commissioner is authorised to submit the Report to the State Government, as required by Section 24 of the B.M.R.D.A. Act, 1974.

Item 7 : Explanatory Memorandum on the Annual Budget Estimates of the Authority for the year 1977-78.

The Explanatory Memorandum was noted. Shri Sudhir Joshi desired to know the details of the contributions made by the State Government under clauses (a) and (b) of sub-section (1) of Section 18 of the B.M.R.D.A. Act. The Metropolitan Commissioner agreed to furnish the information to him.

Ite 8 : Setting up an Urban Art Panel.

After a brief discussion, the consideration of this item was deferred.

Item 9 : The Thane Creek-Ulhas River Inland Waterway Project - Pilot Scheme upto Vashi, New Bombay.

RESOLUTION 121 :- Resolved that the Authority, having considered the details and merits of the Pilot Scheme of construction of a cargo terminal at Vashi, New Bombay (which is a part of the larger Thane-Ulhas Inland Waterway Project), strongly recommends to the State Government that the Pilot Scheme be taken up immediately for implementation as a State Sector Scheme.

Item 10: Bandra-Kurla Complex.
taking over of lands in the -

RESOLUTION 122 :- Resolved that the State Govt. lands in the Bandra-Kurla Complex agreed to be transferred to the BMRDA may be taken over at market value and on the other terms and conditions as may be decided by the State Government.

Resolved further that the Chairman of the Authority is authorised to settle with the CIDCO the amount to be reimbursed to it in respect of the cost of development already done by it on a part of the Government lands in the Bandra-Kurla Complex to be taken over by the BMRDA.

Item 11 : Structure and functioning of the Authority.

It was decided that this matter should be transferred to the Standing Committee for consideration and necessary action.

Item 12: Report of the decisions taken by the immovable Property Committee.

The Member-Secretary, HURE Board, and the Metropolitan Commissioner explained that the report was in respect of the representations made to the State Govt. for the acquisition of land for the projects already approved by the Authority.

The Chairman directed that, if any members wished to have details of the projects, they should be sent to the persons concerned on request.

Smt. Tarabai Vartak, Shri Baswant and a few other members expressed their concern about rehabilitation of the persons affected by acquisition of land. The Chairman agreed that the persons affected by acquisition of land for the projects of the Authority deserved consideration at the hand of the Authority, and indicated that he would be happy if the members concerned would discuss the question with him separately. The Resolution as proposed was then adopted.

RESOLUTION 123 :- Resolved that the decisions taken by the Immovable Property Committee and action taken in pursuance of such decisions, as reported in the agenda note on the item, are noted.

Item 13 : Appointment of Secretary, Executive Committee.

RESOLUTION 124 :- In exercise of the powers conferred by clause (b) of sub-section (1) of Section 7 of the BMRDA Act, 1974, the Authority approves the proposal to appoint Shri S.D. Sule, an officer of the Government of Maharashtra in the cadre of Under-Secretary, as Secretary, Executive Committee of the Authority, on deputation from the Govt. of Maharashtra, with effect from the date of his taking over charge and on the terms of the deputation to be stipulated by the Govt., subject to the Govt. agreeing to his continuance on deputation in the aforesaid post.

Resolved further that, in exercise of the powers conferred by clause (b) of sub-section (2) of Section 6 of the BMRDA Act, the power to appoint Secretary, Executive Committee, vested in the Authority under clause (b) of sub-section (1) of Section 7 of the said Act, be and is hereby delegated to the Standing Committee.

*****

tms/21.6

Annexure - 'A'

List of Members present at the Meeting of the Authority held on the 9th June, 1977.

| | | |
|---|---|---|
| Shri Ratnapa Kumbhar, Minister, (Urban Development). | .. | Chairman |
| Dr. Smt. Sushila Balraj, Minister of State, (Urban Development). | ... | Vice-Chairman |
| Shri Murli S. Deora, Mayor of Bombay. | | Vice-Chairman |
| Shri S.K. Wankhede, Minister, (Industries). | .. | Member. |
| Shri V.R. Hoshing, Minister, (Housing) | .. | " |
| Shri S.V. Bhave, Chief Secretary to the Govt.of Maharashtra, Mantralaya, Bombay-32. | .. | " |
| Shri Hashu Advani, Bombay. | .. | " |
| Shri B.N. Adarkar, Chairman, Transport and Communications Board, BMRDA. | .. | " |
| Shri J.C. Agarwal, Chairman, Bombay Port Trust. | .. | " |
| Shri S.D. Baswant, M.L.C., Shahapur. | .. | " |
| Shri Hans Bhugra, Bombay. | .. | " |
| Shri B.G. Deshmukh, Municipal Commissioner, Bombay Municipal Corporation, Mahapalika Marg, Bombay-1. | .. | " |
| Shri S.S. Dighe, M.L.A. Bombay. | .. | " |
| Shri Sudhir Joshi, Bombay. | .. | " |
| Shri M.A. Khandwani, Bombay. | .. | " |
| Shri D.K. Khanvilkar, President, Alibag Municipal Council, Alibag. | .. | " |
| Shri M.M. Kini, General Manager, Bombay Telephones. | .. | " |

....2/-

| | | |
|---|---|---|
| Shri Sohansingh Kohli,<br>Bombay. | .. | Member. |
| Shri Pushpakant Mhatre,<br>Bombay. | .. | " |
| Shri D.S. Nalavade,<br>Chairman, Standing Committee,<br>Bombay Municipal Corporation. | .. | " |
| Dr. M.G. Parulekar,<br>President, Vasai Municipal<br>Council, Vasai. | .. | " |
| Shri D.N. Patil,<br>Chairman, Panchayat Samiti,<br>Panvel. | .. | " |
| Shri Nakul Patil,<br>M.L.A., Dombivali. | .. | " |
| Shri V.K. Patil,<br>Chairman, Panchayat Samiti,<br>Bhiwandi. | .. | " |
| Shri S.W. Patwari,<br>President, Dombivali<br>Municipal Council, Dombivali. | .. | " |
| Smt. Kamala Raman,<br>M.L.A., Bombay. | .. | " |
| Shri M.M. Sawant,<br>Chairman, B.E.S.T. Committee,<br>Bombay Municipal Corporation. | .. | " |
| Shri V.K. Tembe, M.L.A.,<br>Bombay. | .. | " |
| Smt. Ashalata Toraskar,<br>Chairman, Improvements Committee,<br>Bombay Municipal Corporation. | .. | " |
| Smt. Tarabai Vartak,<br>President, Zilla<br>Parishad Thana. | .. | " |
| Shri H.M. Wangare,<br>President, Zilla<br>Parishad Kolaba. | .. | " |

INVITEES:

Secretary to the Government
of Maharashtra, Urban Development,

Chief Executive Officer,
Maharashtra Industries
Development Corporation (MIDC).

*****

tms/17.6.